
KOKAN BHUMI PRATISHTHAN

समृध्द कोकण

समृध्द कोकण - मेक इन कोकण अभियान

# कोकण व्हिजन परिषद




www.globalkokan.org / www.kokanclub.org

# समृध्द कोकण संघटना एक लोकचळवळ

स्वर्गभूमी कोकण हा देशातील सर्वात निसर्ग समृध्द प्रदेश. कोकणातील निसर्ग, पर्यटन उद्योग, हापूस आंबा, फलोद्यान, मत्स्य उद्योग, प्रक्रिया, बंदर उद्योग, भरपूर पाणी, हुशार मनुष्यबळ यांचे नीट नियोजन केले तर देशातील सर्वात आर्थिक समृध्द प्रदेशाची निर्मिती होईल. पण दुर्दैवाने स्थिती काय ? आज कोकणातील ८० टक्के गावं रिकामी होत आहेत. रोजगार नसल्यामुळे येथील तरुण मुंबई, पुण्यात स्थलांतरित होत आहेत. गावातील ५० टक्के घरे बंद आहेत. गावांचे वृध्दाश्रम होत आहेत. शाळेत जायला मुले नाहीत. रोजगार आणि स्थलांतर ही कोकणची मुख्य समस्या आहे. जर कोकणात गावागावात रोजगार निर्माण झाले तर कोकण खऱ्या अर्थाने समृध्द होईल याच विषयावर गेली २० वर्षे कोकणातील तरुणांना सोबत घऊन एक रचनात्मक लोक चळवळ कोकण भूमी प्रतिष्ठान चालवित आहे. **मुंबईतील 'ग्लोबल कोकण' हा आंतरराष्ट्रीय महोत्सव, कोकण व्हिजन २०२० परिषदा, विविध संमेलने, प्रशिक्षण शिबिरे, अभ्यासदौरे या माध्यमातून कोकणवासियांची मानसिकता बदलणे व प्रत्यक्ष प्रकल्प उभारण्यासाठी उद्युक्त करणे असे उपक्रम आम्ही राबवित आहोत.**

**ग्लोबल कोकण महोत्सव' हा आंतरराष्ट्रीय महोत्सव गेली आठ वर्षे प्रतिष्ठानने आयोजित केला.** याला कोकण व निसर्ग प्रेमींचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.कोकणच्या विकासाला दिशा व गती देण्याचे काम ग्लोबल कोकणने केले. यात दरवर्षी ३ ते ४ लाख कोकणप्रेमी दरवर्षी सहभागी होतात. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, केंद्र व राज्य शासनाचा कृषी व मत्स्य विभाग, पणन, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, जलसंधारण विभाग इ. दरवर्षी सहभागी होतात. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कोकणातील मंत्री, विविध पक्षांचे कोकणातील नेते, यांचे मार्गदर्शन व सहभाग या अभियानात मिळत आहे. कोकणातील उद्योजक, सिने नाटय कलावंत, साहित्यिक, विविध क्षेत्रातील मान्यवर यात आवर्जून सहभागी होत आहेत.

**कोकण भूमी प्रतिष्ठान ही देशातील एकमेव संघटना आहे, जीने स्वतःच्या प्रदेशाचा विकास आराखडा तयार केला आहे.** २००७ मध्ये दापोली येथे कोकण व्हिजन परिषद आयोजित करण्यात आली. यावेळी **राज्याचे माजी मुख्य सचिव श्री. द.म.सुकथनकर व स्व.अरुण बोंगिरवार** यांच्या मार्गदर्शनाखाली विविध क्षेत्रातील तज्ञाच्या मदतीने प्रतिष्ठानने कोकण विकासाचा जाहिरनामा तयार केला असून शासन स्तरावर त्याचा सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. या जाहिरनाम्यानुसार घडलेला प्रमुख गोष्टी येथे नमूद करता येतील.

१) कोकणात ग्रामीण पर्यटनाचा विकास व्हावा यासाठी प्रतिष्ठानने कोकण ग्रामीण व सागरी पर्यटनाची योजना शासनास सादर केली. शासनाने ही योजना मंजूर करुन त्यासाठी ५० कोटी निधी मंजूर करण्यात आला. याअंतर्गत **कोकणातील २५ गावे व सागर किनाऱ्यावर पर्यटनदृष्टया पायाभूत सुविधांची उभारणी केली जाणार असून या योजनेच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली आहे.**

२) **रॅमन मॅगासेसे व स्टॉक होम वॉटरप्राईज विजेते जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंह यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिष्ठानने कोकणात जलअभियान** सुरु केले असून त्याअंतर्गत **गांधारी (महाड), जगबुडी (खेड), अर्जुना (राजापूर), जानवली (कणकवली) या चार नद्यांच्या पुनरुज्जीवनाचे कार्य लोकसहभागातून सुरु आहे. या चार नद्यांसाठी शासनाने प्रत्येकी २.५० कोटी याप्रमाणे रु. १० कोटी निधी मंजूर** केला असून याअंतर्गत या नद्यावर लोकसहभागातून मोठ्या धरणांऐवजी छोटी धरणे व बंधाऱ्यांची उभारणी केली जाणार आहे.

३) कोकणात कृषी व ग्रामीण पर्यटनातून रोजगार व स्वयंरोजगार निर्मितीसाठी प्रतिष्ठान आग्रही असून यासंदर्भात शासन स्तरावर परवानग्या तसेच पॉलिसी तयार होण्याच्या दृष्टीने सातत्याने पाठपुरावा सुरु असून **आज कोकणात कृषी पर्यटन, होम स्टे व ग्रामीण पर्यटनाची आदर्श मॉडेल उभी राहिली आहेत.**

**शासनाने कोकणातील अनेक विषय मार्गी लावले आहेत. काहीचे काम सुरु आहे. याबद्दल शासनाचे मनःपूर्वक अभिनंदन...**

- **मुंबई - गोवा - राष्ट्रीय महामार्ग (क्र.६६) चे काम वेगाने सुरु आहे.**
- **सागरी महामार्गाचे काम लवकरच सुरु होत आहे.**
- **जलवाहतूकीची पूर्वतयारी झाली असून अलिबाग, भाऊचा धक्का, दिघी येथून रो-रो सर्विस तसेच क्रूझ टर्मिनल झाल्यावर जलवाहतूकीस सुरुवात होईल.**
- **रत्नागिरी व चिपी ही विमानतळे कार्यान्वीत झाली असून पनवेल विमानतळाचे काम सुरु आहे.**
- **हापूस आंब्याला GI मानांकन मिळाले.**
- **घाट माथ्यावरील सिंचनासारखी कालवा पध्दती कोकणात उपयोगाची नसून पाईपलाईन व्दारे पाणी पुरवठा करण्यात यावा ही प्रतिष्ठानची मागणी होती. त्यानुसार कोकणात कालवा पध्दती न राबवता पाईपलाईनव्दारे पाणी पुरवठा सुरु करण्यात येणार आहे.**
- **कोकण रेल्वे मार्गाच्या दुपदरीकरणाचे काम सुरु झाले आहे.**

या दृष्टीने असे अनेक विषय आहेत. जे कोकणात होणे आवश्यक आहे. प्रतिष्ठानने ज्याप्रमाणे संपूर्ण कोकणचा विकास आराखडा तयार केला आहे, त्याप्रमाणे कोकणातील प्रत्येक जिल्हयाचे स्वतंत्र व्हीजन डॉक्यूमेंट तयार करावे अशी आमची कल्पना आहे. कोकणात पुढील १० वर्षात काय करायचे आहे. याचा आराखडा सर्वांसमोर मांडण्यात येणार असून **यासाठी कोकण व्हिजन २०३० परिषदेचे आयोजन करण्यात येत आहे.** विविध क्षेत्रातील मान्यवर तज्ञ या परिषदेला आवर्जून उपस्थित राहणार आहेत. **याचवेळी कोकणाचे व कोकणातील प्रत्येक जिल्हयाचे व्हिजन डॉक्यूमेंट प्रकाशित करण्यात येईल.** आपण आवर्जून उपस्थित रहावे.

➢**कोकण भूमी प्रतिष्ठान :-** कोकणातील कर्तृत्ववान व्यक्तींना, नवयुवकांना एकाच व्यासपीठावर आणणे, निसर्ग समृध्द कोकणाला आर्थिक समृध्द करण्यासाठी सुरु झालेली चळवळ म्हणजे समृध्द कोकण अभियान, मागील १५-२० वर्षे कोकण विकासाची प्रक्रिया वेगाने सुरु आहे. या विकासाच्या प्रक्रियेत स्थानिक कोकणवासीय / भूमिपुत्रांनी सहभागी व्हावे, यासाठी **कोकण व्हिजन परिषदा, विविध संमेलने प्रशिक्षण शिबीर, अभ्यासदौरे** या कार्यक्रमातून कोकणवासियांची मानसिकता बदलणे, त्यांना प्रत्यक्ष प्रकल्प उभारणीसाठी उद्युक्त करण्याचा प्रयत्न या अभियानातून केला जातो.

✍**ग्लोबल कोकण :-** कोकण पर्यटनाची आंतरराष्ट्रीय प्रसिध्दी करणारा हा एकमेव महोत्सव. कोकणातील निसर्ग, पर्यटन स्थळे, संस्कृती, लोककला, खाद्यपदार्थ यांना जागतिक व्यासपीठ मिळावे म्हणून ग्लोबल कोकण आंतरराष्ट्रीय महोत्सव सुरु करण्यात आला. गेली ५ वर्ष या महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. ५०० उद्योजक या महोत्सवात सहभागी होतात. **५० कोटींची आर्थिक उलाढाल होते. या महोत्सवाने कोकण पर्यटनाचा जागतिक ब्रॅण्ड तयार झाला.** महोत्सवामध्ये दरवर्षी केंद्रीय मंत्री, राज्याचे मंत्री यांचा सहभाग असतो. WTM लंडन, ITB बर्लिन, जपान या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात ग्लोबल कोकणचा पर्यटन ब्रॅण्ड विकसित झाला. आता देशभरात होणाऱ्या पर्यटन प्रदर्शनात सहभागी होऊन पर्यटनाचा ब्रॅण्ड विकसित करणार.

✍**कोकण व्हिजन :-** कोकण विकासात महत्त्वाच्या ठरणाऱ्या विषयावर कोकण व्हिजन २०२० या परिषदेत सांगोपांग चर्चा करण्यात येते. या परिषदेतील व्यक्त झालेली मते व १०० हून अधिक तज्ज्ञांच्या मदतीने प्रतिष्ठानचे मार्गदर्शक व **माजी मुख्य सचिव मा. द.म.सुकथनकर** यांच्या मार्गदर्शनाखाली व्हिजन आराखडा तयार केला. पायाभूत सुविधा, बंदर विकास पर्यटन या त्रिसूत्रीला प्राधान्य देण्याची सूचना करण्यात आली. या अभियानात मांडलेल्या अनेक विषयामध्ये प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. **उदा. मुंबई - गोवा महामार्गाचा चौपदरीकरण, नॅशनल हायवे ६६ म्हणून मान्यता, मरिन युनिव्हर्सिटी, ग्रामीण पर्यटन विकासासाठी दरवर्षी ५० कोटी, कोकणातील बंदराचा विकास, मत्स्य बीज केंद्र, पर्यटन क्षेत्री पायाभूत सुविधा विकास. आता समृध्द कोकण अभियानांतर्गत प्रत्येक तालुक्याचा विकास आराखडा बनविण्यात येणार आहे.**

✍**कोकण पर्यटन उद्योग संघ :-** शासनाच्या नवीन कोकण पर्यटन विकास धोरणामुळे कोकणात पर्यटन व्यवसायामध्ये मोठ्या संधी निर्माण होणार आहे. या पार्श्वभूमीवर कोकण पर्यटन उद्योग संघाची स्थापना करण्यात आली. कोकणातील पर्यटन व्यावसायिकांची ही संघटना आहे. संघटनेच्या प्रत्येक तालुक्यात शाखा सुरु होत आहेत. सदस्यांच्या पुढाकाराने व तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली कोकणातील पर्यटनदृष्टया महत्त्वाच्या ५० गावांचा आंतरराष्ट्रीय मानांकनाप्रमाणे विकास करण्यासाठी आराखडा तयार करण्यात येत आहे. **राज्य शासनाने यावर्षीच्या अर्थसंकल्पात १७४ कोटीची तरतूद पर्यटनदृष्टया महत्त्वाच्या गावातील पायाभूत सुविधेसाठी केली.**

✍**कोकण भूमी कृषी पर्यटन सहकारी संस्था :-** निसर्ग, पर्यावरण, ग्रामीण जीवन, लोककला हे समजून घेण्यासाठी पर्यटकांनी कोकणात यावे. त्यांना कृषी - ग्रामीण जीवनाचा अनुभव देणारी केंद्रे गावागावात सुरु व्हावीत. असा प्रयत्न कोकण भूमी कृषी पर्यटन सहकारी संस्था करते. प्रतिष्ठानच्या माध्यमातून १०० हून अधिक कृषी पर्यटनाची केंद्रे कोकणात सुरु झाली आहे.

✍**जलसमृध्द कोकण प्रतिष्ठान :-** कोकणातील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी जलसमृध्द कोकण प्रतिष्ठान या फाऊंडेशनची निर्मिती करण्यात येत आहे. कोकणातील ज्या ग्रामस्थांनी स्वतःच्या गावात लोकचळवळीतून, श्रमदानाने नद्यांतील गाळ काढणे, नदी खोलीकरण, बंधारा बांधणे यासारखी जलव्यवस्थापनाची कामे केली आहेत. त्यांना सहकार्य करण्याचे काम हे फाऊंडेशन करणार आहे.

✍**जीवन शिक्षण प्रबोधिनी :-** फलोद्यान, फळप्रक्रिया, आधुनिक शेती, मत्स्यसंवर्धन, पर्यटन, कृषी पर्यटन, पशुपालन या विकासाच्या विषयातील, व्यवसायाच्या संधीचे माहिती देणारे शिक्षण म्हणजे जीवन शिक्षण. कोकण विकासाच्या विषयासंदर्भात दर महिन्याला प्रशिक्षण आयोजित करण्यात येते. **आतापर्यंत २५००० लोकांनी प्रशिक्षण व अभ्यासदौऱ्यात सहभाग घेतला असून २००० हून अधिक लोकांनी प्रकल्प सुरु केले आहेत.** ज्या कोकणवासियांना प्रकल्प सुरु करायचे आहेत त्यांना मार्गदर्शन करण्यात येते. शासकीय, प्रशासकीय अडचणी सोडविण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येते.

**संजय यादवराव,** संस्थापक अध्यक्ष, समृध्द कोकण संघटना

# कोकण विकास अभियान उपक्र



कोकण पर्यटन व्हिजन परिषद












ग्लोबल कोकण पर्यटन परिषद





ॲडव्हान्टेज कोकण - मुंबई


कोकण विकास यात्रा - डहाणू ते वेंगुर्ला


कोकण जलपरिक्रमा (मुंबई ते सिंधुदुर्ग) २०१६

# म व कार्यक्रम - २००४ ते २०१९













टूरिझम व्हिजन २०२० परिषद - २०१४



मत्स्योद्योग परिषद २०१८



कोकण विकास यात्रा - डहाणू ते वेंगुर्ला



ग्लोबल कोकण महोत्सव

# समृध्द कोकण संघटना - जाहिरनामा व मागणीपत्र



- येऊ घातलेली मेगा भरती शिक्षक, तलाठी, कृषी सेवक, ग्रामसेवक व अन्य सरकारी भरतीत कोकणातील पदावर ८० टक्के कोकणातील तरुणांना नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत. बाहेरील जिल्हयातून येऊन कोकणात भरती व्हायचे व दोन वर्षात जिल्हा बदली घ्यायची हे घोटाळे बंद झाले पाहिजेत.
- कोकणातील दोन स्वतंत्र व्यावसायिक शिक्षण विद्यापीठ! (१) पालघर, ठाणे (२) रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग



- स्वतंत्र कोकण पर्यटन महामंडळ, एम.एम.आर.डी.ए. प्रमाणे ही कोकण टूरिझम डेव्हलपमेंट अथॉरिटी असावी. महामंडळाला पुढील १० वर्षे पायाभूत सुविधा विकासासाठी दरवर्षी १००० कोटी निधी उपलब्ध करुन द्यावा.
- चिपळूणच्या खाली संपूर्ण रत्नागिरी, सिंधुदूर्ग जिल्हे व उर्वरित कोकणातील डहाणू, श्रीवर्धन, दापोली, गुहागर यासारखे निसर्ग समृध्द काही भाग भारताचा **Happiness Zone** म्हणून जाहिर करावा व येथे पर्यटन व निसर्गपूरक उद्योगावर भर दयावा.



- पर्यटनाची आधुनिक शहरे, फूड पार्क, **IT Park, Education Hub, Innovation Park,** इंजिनिअरिंग उद्योग, बंदर विकास, एक्सपोर्ट झोन्स पर्यावरण पूरक उद्योग येथे यावेत.
- सहकारी पर्यटन प्रकल्प, होम स्टे, कृषी पर्यटन, जल पर्यटन, साहसी पर्यटन, नाविन्यपूर्ण पर्यटन याकरिता ३०-४० टक्के अनुदान व सवलतीच्या दरात कर्जपुरवठा याकरिता दरवर्षी ५०० कोटी तरतूद.



- **CRZ** व अन्य विषयात पर्यटन व अन्य उद्योगासाठी सुटसुटीत धोरण व जिल्हास्तरावर सहज परवानग्या मिळण्याची व्यवस्था.
- २०१९ पर्यत सर्व पर्यटन बांधकामे नियमित करणे.
- हॉटेल, रिसॉर्ट, पर्यटन, उद्योग सुरुवातीची १० वर्षे **Tax Benefit.**



- कोकण ग्रामीण पर्यटनासाठी दरवर्षी १०० कोटी निधी व दरवर्षी किमान २५ निसर्ग समृध्द गावांचा सर्वांगीण पर्यटन सुविधा विकास.
- पर्यटनासाठी औद्योगिक दराने वीज पुरवठा.
- कोकण पर्यटनाची देश विदेशात प्रसिध्दी व संपूर्ण कोकण पर्यटन माहिती, सुविधा जगासमोर नेणारी पोर्टल, डिजिटल व्यासपीठ

# समृध्द कोकण संघटना - जाहिरनामा व मागणीपत्र











- द्राक्ष व पश्चिम महाराष्ट्रप्रमाणे कोकणातील वायनरी उद्योग उत्पादन शुल्क माफी.
- जागतिक दर्जाचे पर्यटन कोकणात विकसीत होण्यासाठी काही आकर्षणे निर्माण करावी लागतील उदा. सेंट्रल म्युझियम ऑफ कोकण, आदिवासी, कला, संस्कृती, बायोडायव्हर्सिटी, मरीन लाइफ इत्यादी विषयावर म्यूझियम, सी-वर्ल्ड, **Aquarium**, रोपवे, समुद्र किनाऱ्यावर पर्यटनाची आधुनिक शहरे आणि सुविधा, महत्त्वाच्या पर्यटन स्थळावर जागतिक दर्जाच्या सुविधा इत्यादी.
- कोकणात मत्स्य उद्योग विकासासाठी कोळंबी, तिलापिया, जिताडा, खेकडा या पिकांच्या उत्पादनांच्या हॅचरीज आणि नर्सरी निर्माण केल्या पाहिजे. हे उद्योग उभारण्यासाठी खाद्यांचे कारखाने व सहजपणे परवानग्या, कर्ज पुरवठा, कमी व्याजदाराने कर्ज, या सुविधा निर्माण केल्या पाहिजेत. कोकणात तंत्रज्ञानासह फिशरीज जेट्टी विकसीत करायला हव्यात. हर्णे, आनंदवाडी, मिऱ्या या मंजूर झालेल्या जेट्टी शिघ्र गतीने पूर्ण करायला हव्यात.
- समुद्र, बंदरे, पर्यटन, उद्योग, मासेमारी प्रामुख्याने कोकणात म्हणून राज्याचा पर्यटनमंत्री, बंदरविकास मंत्री, मत्स्य उद्योग मंत्री कायम कोकणातून असावा.
- मत्स्योद्योग महामंडळ, मेरी टाईम बोर्ड, कोकण पर्यटन महामंडळ, कोकण सिंचन मंडळ, कोकण म्हाडा, सिडको, कोकण पाटबंधारे मंडळ इ कोकणाशी संबंधीत मंडळावर कोकणातील अध्यक्ष व त्या - त्या विषयात काम करणाऱ्या कोकणातील तज्ञ व्यक्तीची नेमणूक करावी.
- प्रत्येक तालुक्यात किमान एक मोठा बहुउद्देशीय प्रक्रिया फूड पार्क यासाठी विशेष योजना व सवलतीच्या दरात कर्ज पुरवठा.
- ऊस, कापूस, धान्य, द्राक्ष, डाळिंब इतर भागातील या विषयातील शेतकऱ्यांना जशी कर्जमाफी, वीज माफी, सवलतीच्या दरात कर्ज, अशा सुविधा दिल्या जातात अशाच कोकणात हापूस आंबा, काजू व अन्य शेतकऱ्यांना आणि गेली अनेक वर्षे मत्स्य दुष्काळामुळे अडचणीत असलेल्या मच्छिमार बांधवाना द्याव्यात.
- हॉटेल मॅनगमेंट, हॉस्पिटॅलिटी, फूड प्रोसेसिंग, कृषी व्यवसाय व्यवस्थापन... इ. कोकणात होऊ शकणाऱ्या व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याच्या जागतिक दर्जाच्या व्यवस्था.
- हापूस आंबा मार्केटिंगसाठी एप्रिल-मे दोन महिने स्थायी स्वरुपाची शेतकरी बाजार व्यवस्था मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद इ. ठिकाणी व याकरिता दरवर्षी २५ कोटी निधी.